मूल्य : ५ रुपये

स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

Volume : 1, Issue : 5. वर्ष : १, अंक : ५

सप्टेंबर २०२६

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

रत्नागिरी

## 'अर्थ' कुटुंब झाले ५०,००० सभासदांचे...

लेखापरीक्षणात

'अ'

वर्ग

परंपरा ३४ वर्षे कायम!



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

# ५० हजार सभासदांचा टप्पा

## सहकाराची रचनात्मक ताकद




**कार्यक्षेत्राचा विस्तार :** रत्नागिरी तालुका → रत्नागिरी जिल्हा → महाराष्ट्र राज्य

## मूलभूत वैशिष्ट्ये

- विश्वासार्हता
- आर्थिक शिस्त
- सातत्य
- पारदर्शकता
- ग्राहकसेवा
- सभासदांचा सक्रिय सहभाग
- स्वावलंबन

## संपादकीय

# पन्नास हजार सभासद - सहकाराची रचनात्मक ताकद

सहकाराची रचनात्मक ताकद अनुभवायची असेल, तर स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला 'रोल मॉडेल' म्हणता येईल. माझे हे वाक्य आत्मप्रौढीचे नाही. सहकारातील वस्तुपाठ गिरवत गेली ३५ वर्षे सभासदांना सातत्यपूर्ण आर्थिक सेवा देण्याचे काम स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था करत आली आहे.

केवळ ३०० सभासदांना एकत्र जमवून हा प्रवास सुरू झाला. सहकारी पतसंस्था केवळ आपल्या सभासदांनाच आर्थिक सेवा देऊ शकते, हे तत्त्व स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने मनोमन अंगीकारले. स्वरूपानंद पतसंस्थेने समाजाच्या सर्व स्तरांतून सभासदांना अर्थविश्वात सामावून घेतले. हे करताना संस्थेने विश्वासार्हता, आर्थिक शिस्त आणि कमालीचे सातत्य ठेवले. तसेच संस्थेशी संलग्न झालेल्या सभासदांना विश्वासार्ह आर्थिक सेवा देणारी आपली संस्था अशी ओळखही निर्माण केली. ग्राहकसेवेचे बाळकडू आपल्या संपूर्ण व्यवस्थेत राबवून सभासद ग्राहकांच्या सद्भावना, स्नेह याचे भांडवलही संस्थेने अर्थकारणाइतकेच जमा केले. ३०० सभासदांचा परिवार आता ५० हजार सभासदांचा विशाल अर्थपरिवार झाला आहे. ५० हजार सभासदांचा एकजिनसी समूह ही प्रचंड ताकद आहे.

प्रत्येक सभासदाचे सहकार्य घेत स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने मोठी भांडवलनिर्मिती केली. या प्रवासातील प्रत्येक पावलाचा सक्रिय साक्षीदार होण्याचे भाग्य मला मिळाले. हा अनुभव खरोखरच चित्तथरारक होता. प्रारंभी अवघ्या दोन हजार रुपयांचे कर्ज देताना करावी लागलेली धडपड, ५०-१०० रुपये, शे-पाचशे रुपये जमा करण्यासाठी झिजवलेले उंबरठे, जिवाच्या आकांताने केलेली संस्थेची मांडणी, यातून हळूहळू वाढत गेलेला कर्जव्यवहार...

त्यापुढचे पाऊल ठरले पिग्मी योजना. प्रत्येक खातेदाराकडे जाऊन केलेली आर्जवे, त्यातून हळूहळू मिळत गेलेले यश, त्यातून निर्माण झालेले पिग्मी एजंट, त्यांनी दिलेली विश्वासार्ह आणि नेमस्त सेवा, त्यातून रोज जमा होणारी सहा ते सात लाखांची पिग्मी यामुळे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या अर्थकारणाला लय मिळाली. त्याच्या पुढचा टप्पा आला ठेववृद्धी अभियानाचा. प्रत्येक ठेवीदाराकडे जाऊन, गावोगावी प्रवास करून सातत्याने केलेला संपर्क हळूहळू बहरू लागला, फलद्रूप होऊ लागला. पाहता पाहता १० कोटी, ५० कोटी, १०० कोटी..., ४५० कोटी रुपये... असा ठेवींचा आकडा वृद्धिंगत होऊ लागला. स्वामी स्वरूपानंदांच्या नामाचा महिमा, त्यातच ठेव योजनांना पूर्ण श्रद्धेने आणि पवित्र भावनेने ठेवलेली स्वरूपांजली, श्रीस्वरूप इत्यादी नावे संस्थेला यश देत गेली. सहकार चळवळीत सभासदांना सोबत घेत योग्य रचना केली, उत्तम व्यवस्था निर्माण केली, पारदर्शक, विश्वासार्ह, शिस्तबद्ध आचरण ठेवले, तर यशस्वी, भक्कम अर्थविश्व निर्माण होते, हे चित्र स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने प्रत्यक्षात उतरवून दाखवले आहे.

आधी तालुका, मग जिल्हा आणि मग राज्य कार्यक्षेत्र पादाक्रांत करून पतसंस्थेने अर्थकारणाची व्याप्ती वाढवली आणि ५० हजार सभासदांचे स्वरूप अर्थकुटुंब साकारले. या सभासदांच्या सहभागाने, सहयोगाने हे अर्थविश्व गुंफले गेले आहे. सभासदांना आर्थिक सेवा देऊन शहरापासून ग्रामीण भागापर्यंत आपला कार्यविस्तार करत पतसंस्थेने ७६० कोटींचा संमिश्र व्यवसाय केला आहे. आपल्या १७ शाखांच्या माध्यमातून प्रत्येक सभासदाला विश्वासार्ह आणि अचूक आर्थिक सेवा देण्याचा यशस्वी, उपयुक्त कित्ता स्वरूपानंद पतसंस्थेने गिरवला आहे.

स्वावलंबनाचा आविष्कार करत कोणत्याही वित्तीय संस्थेचा आधार न घेता केवळ सभासदांच्या सहभागातून मजबूत दीर्घकालीन अर्थकारण करता येते, याची अनुभूती स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने दिली. ५० हजार सभासदांचा अर्थसमूह आणि त्याची सातत्यपूर्ण वृद्धिंगत होणारी वाटचाल याचे विश्लेषण केले, तर लक्षात येते, की प्रत्येक सभासदाच्या वाढत्या संख्येबरोबर अर्थकारणाचा पाया विस्तारत गेला. सभासदांचा विस्तारत जाणारा पाया आणि त्यावर उभी राहणारी भक्कम आर्थिक इमारत असे सुंदर चित्र स्वरूपानंद पतसंस्थेने निर्माण केले. सहकाराची रचनात्मक ताकद, भांडवलनिर्मिती क्षमता, रोजगारनिर्मिती क्षमता याची अनुभूती जगाला देण्यासाठी संस्थेचे योगदान लक्षणीय आहे, असे म्हटले तर अवास्तव ठरणार नाही.

आर्थिक निकष, आकडेवारी, प्रमाणबद्धता कायम राखताना सर्व सभासदांचा आत्मसन्मान वाढावा, आर्थिक उन्नती व्हावी, सामाजिक बांधिलकी जपावी, नवयुवकांचाही उचित सहभाग असावा यासाठी पतसंस्था सातत्याने प्रयत्न करत आहे आणि हे प्रयत्न कमालीचे यशस्वी होत आहेत. त्यामुळेच ५० हजार सभासदांचा एकजिनसी समूह आणि त्याची एकजिनसी आर्थिक ताकद बनून पतसंस्था सहकार जगतात मान्यता प्राप्त करत आहे.



**- ॲड. दीपक पटवर्धन,**
संपादक, स्वरूप सहकार

**वर्ष : १, अंक : ५. Volume : 1, Issue : 5. September 2026.** RNI No. MHMAR/25/A4199. सप्टेंबर २०२६. *पाने १२. *किंमत ५ रुपये

'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा' या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक सिद्धिविनायक प्रिंटर्स, कारवांचीवाडी, रत्नागिरी' येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर. **मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स. **संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२. **संपर्क :** (०२३५२) २२१२६३/२९५३६३. **वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com

This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Siddhivinayak Printers, Karwanchiwadi, Ratnagiri and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri – 415612. **Editor :** Adv. Deepak Manohar Patwardhan. **Executive Editor :** Aniket Konkar

# स्वरूपानंद पतसंस्थेच्या शिस्तबद्ध, अचूक व्यवहारांचा दाखला देणारा ऑडिट रिपोर्ट

# अ वर्ग मिळवण्याची परंपरा यंदाही कायम

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने लेखापरीक्षणात अ वर्ग प्राप्त करण्याची परंपरा यंदाही कायम राखली आहे. 'सातत्याने ३४ वर्षे अ वर्ग प्राप्त करणारी पतसंस्था' ही ओळख अत्यंत अभिमानास्पद आहे. पतसंस्थेच्या शिस्तबद्ध, पारदर्शक आणि अचूक व्यवहारांचा दाखला देणारा असा हा लेखापरीक्षण अहवाल (ऑडिट रिपोर्ट) आहे. त्याची ओळख करून देणारा हा लेख.... ...............**

**नफा-तोटा पत्रक :-**

संस्थेने सन दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या आर्थिक वर्षाचे नफा तोटा पत्रक विवेचन खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | तपशील | गतवर्षा अखेर ₹ | चालूवर्षा अखेर ₹ | वाढ / घट |
|---|---|---|---|---|
| **अ** | **उत्पन्न** | | | |
| १ | कर्जावर मिळालेले व्याज | २७,५४,१६,०३१.०० | ३३,१८,४३,५३८.०० | ५,६४,२७,५०७.०० |
| २ | **गुंतवणुकीवर मिळालेले व्याज** | | | |
| | अ)ठेवींवरील व्याज | ११,३४,६५,८७१.४५ | १३,३०,७०,०५३.०० | १,९६,०४,१८१.५५ |
| | ब)शासकीय कर्जरोख्यावरील व्याज | ० | ० | ० |
| 3 | इतर उत्पन्न | १,१०,७३,१४९.२६ | १,६७,१९,३२९.८६ | ५६,४६,१८०.६० |
| | **एकूण उत्पन्न** | **३९,९९,५५,०५१.७१** | **४८,१६,३२,९२०.८६** | **८,१६,७७,८६९.१५** |
| **ब** | **खर्च** | | | |
| १ | ठेवींवरील व्याज | २३,६६,८५,७९८.१४ | २८,९७,४१,९८१.०० | ५,३०,५६,१८२.८६ |
| २ | आस्थापना खर्च | ४,६५,५०,४८१.०० | ४,९९,१८,२३३.०० | ३३,६७,७५२.०० |
| 3 | प्रशासकीय खर्च | २,८०,६३,१७७.०२ | २,७७,६४,७५९.३९ | -२,९८,४१७.६३ |
| ४ | तरतुदी | ४४,५०,०००.०० | १२,५०,०००.०० | -३२,००,०००.०० |
| ५ | इतर खर्च | ९,३७,०३९.९६ | ३५,२९,३२४.०० | २५,९२,२८४.०४ |
| | **एकूण खर्च** | **३१,६६,८६,४९६.१२** | **३७,२२,०४,२९७.३९** | **५,५५,१७,८०१.२७** |
| | **निव्वळ नफा** | **८,३२,६८,५५५.५९** | **१०,९४,२८,६२३.४७** | **२,६१,६०,०६७.८८** |

- लेखापरीक्षण मुदतीत उत्पन्नात ₹ ८१६.७८ लाख वाढ झाली आहे. एकूण खर्चात ₹ ५५५.१८ लाख वाढ झाली आहे.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला लेखापरीक्षणात (ऑडिट) ३४ वर्षे सातत्याने अ वर्ग मिळत आहे. संस्थेचे लेखापरीक्षण हे कायद्यातील तरतुदीनुसार सहकार खात्याच्या पॅनेलवर असणाऱ्या चार्टर्ड अकाउंटंटकडून केले जाते. सहकार खात्याने ठरवून दिलेल्या गुणपत्रिकेप्रमाणे सर्व व्यवहार ठेवलेले रेकॉर्ड, नोंदी कागदपत्रे यांचे परीक्षण नियुक्त सीए करतात आणि आपला विस्तृत ऑडिट रिपोर्ट देतात. 'संस्थेच्या स्वच्छ व्यवहारांचा आरसा' असे या लेखापरीक्षण व्यवहाराचे वर्णन यथार्थ ठरेल.

या अहवालाचा धावता आढावा घेतला, तर गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढलेले विविध व्यवहार, ठेवींमध्ये झालेली वाढ, कर्जवितरणामध्ये झालेली वाढ, तसेच वसुलीत आणि नफ्यात झालेली वाढ, खेळत्या भांडवलातील वाढ, तसेच खेळत्या भांडवलाशी निव्वळ नफ्याचे असलेले प्रमाण, वाढलेल्या प्रमाणबद्ध बँक गुंतवणुका, सहकार खात्याने ठरवून दिलेली विविध आर्थिक प्रमाण, कर्ज-ठेवींचे प्रमाण, ठेव आणि एसएलआर गुंतवणुकीचे प्रमाण, प्रशासकीय खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण, एनपीएचे प्रमाण, भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण अशा अनेक अर्थबिंदूंचे विश्लेषण, अचूकता लेखापरीक्षणाच्या माध्यमातून प्रमाणित होते. संस्थेचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, त्यातील आकडेवारी याची अचूकता तपासली जाते. संपूर्ण कर्जव्यवहार, तसेच सर्वच आर्थिक व्यवहारांची प्रत्येक नोंद, ठेवलेली व्हाउचर्स, खर्च करण्याची कार्यपद्धती या सगळ्याची तपासणी केली जाते. संस्थेची इतिवृत्ते, त्यातील ठराव तपासले जातात. थोडक्यात, संस्थेच्या संपूर्ण व्यवहारांची अत्यंत डोळसपणे तपासणी होते. यासाठी गुणपत्रक तयार असते. त्या गुणांकनाप्रमाणे गुण दिले जातात. या गुणांची सरासरी काढून गुण ठरतात. आपल्या स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला नेहमीच ८२ ते ८५ टक्के गुण मिळत आले. या ठिकाणी एक आठवण करून देणे इष्ट ठरेल. ३१ मार्च रोजी जी आर्थिक पत्रके घोषित होतात, ती अचूक असतात हे आजपर्यंतच्या प्रत्येक लेखापरीक्षण अहवालावरून सहज सिद्ध होते.

वर्षभरात होणारे हजारो व्यवहार, त्यात गुंतलेले कोट्यवधी रुपये, या व्यवहारांना सूचीबद्ध करणारे रेकॉर्ड, नोंदी, तयार केलेली कागदपत्रे, फॉर्म्स, करार या प्रत्येकाची तपासणी आणि अचूकता लेखापरीक्षणातून समोर येत असते. त्यात त्रुटी किंवा अनियमितता असतील, तर त्याही दर्शवल्या जातात. रिपोर्ट प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांत त्रुटींची दुरुस्ती करून दोषदुरुस्ती अहवाल लेखापरीक्षकांना सादर होतो. त्यांच्या अवलोकनानंतर त्यावर त्यांचे स्पष्ट शेरे घेऊन हा अहवाल सहकार खात्याकडे सादर होतो. सुदैवाने आजपर्यंत कोणत्याही गंभीर त्रुटी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या कोणत्याही अहवालात नमूद झाल्या नाहीत, इतके स्वच्छ आणि अचूक व्यवहार आणि कार्यपद्धती स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने अवलंबली आहे. हेच संस्थेच्या विश्वासार्ह प्रतिमेचे गमक आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील काही रोचक आकडे आणि स्टेटमेंट्स अवलोकनासाठी प्रसारित करण्याचा मोह आवरता येत नाही.

**– ॲड. दीपक पटवर्धन**

**आर्थिक प्रमाणके :-**

खालील आर्थिक प्रमाणकांबाबत तपशीलवार अभिप्राय नमूद करावेत.

| अ. क्र. | तपशील | गणना सूत्र | आदर्श प्रमाण % | प्रत्यक्ष प्रमाण % २०२६ |
|---|---|---|---|---|
| अ) | **खेळत्या भांडवलाशी प्रमाण** | | | |
| १ | वसूल भाग भांडवल | वसूल भागभांडवल ÷ खेळते भांडवल X १०० | २ ते ४ | ०.४५ |
| २ | निधी | एकूण निधी ÷ खेळते भांडवल X १०० | ४ ते ६ | ११.३९ |
| ३ | ठेवी | एकूण ठेवी ÷ खेळते भांडवल X १०० | ८० ते ८५ | ८३.६८ |
| ४ | इतर देणी | इतर देणी ÷ खेळते भांडवल X १०० | २ ते ३ | २.१८ |
| ५ | निव्वळ नफा | निव्वळ नफा ÷ खेळते भांडवल X १०० | १ ते २ | २.२४ |
| ६ | रोख व बँकेतील शिल्लक | रोख व बँकेतील शिल्लक ÷ खेळते भांडवल X १०० | ४ ते ६ | ०.७४ |
| ७ | गुंतवणूक | गुंतवणूक ÷ खेळते भांडवल X १०० | २५ | ३४.६५ |
| ८ | कर्जे | कर्जे ÷ खेळते भांडवल X १०० | ६० ते ६५ | ६२.०१ |
| ९ | इतर येणी | इतर येणी ÷ खेळते भांडवल X १०० | ६ | ०.३९ |
| १० | एकूण उत्पन्न | एकूण उत्पन्न ÷ खेळते भांडवल X १०० | ११ | ९.८६ |
| ११ | व्यवस्थापन खर्च | व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल X १०० | २ | १.५९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | व्यवस्थापन खर्च | व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल X १०० | २ | १.५९ |
| ब) | **एकूण उत्पन्नाशी प्रमाण** | | | |
| १ | निव्वळ नफ्याचे | निव्वळ नफा ÷ एकूण उत्पन्न X १०० | १० | २२.७२ |
| २ | व्यवस्थापन खर्चाचे | व्यवस्थापन खर्च ÷ एकूण उत्पन्न X १०० | ३० ते ३५ | १६.१० |
| 3 | आस्थापना खर्च | आस्थापना खर्च ÷ एकूण उत्पन्न X १०० | २० ते २५ | १०.३६ |
| ४ | दिलेले व्याज | दिलेले व्याज ÷ एकूण उत्पन्न X १०० | ५० ते ५५ | ६०.१६ |
| क ) | **अन्य प्रमाणके** | | | |
| १ | निधीच्या खर्चाचे प्रमाण | ठेवींवर दिलेले व्याज + कर्जावर दिलेले व्याज ÷ ठेवी + कर्जे X १०० | | ७.१५ |
| २ | नफ्याचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण | नफा ÷ उत्पन्न X १०० | | २२.७२ |
| ३ | निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण | निव्वळ नफा ÷ सरासरी खेळते भांडवल X १०० | | २.३७ |
| ४ | व्यवसायातील नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण | व्यवसायातील नफा(तरतुदीपूर्वी) ÷ सरासरी खेळते भांडवल X १०० | | २.५० |
| ५ | नफ्याचे कर्ज + गुंतवणुकीशी प्रमाण | नफा ÷ कर्ज+गुंतवणूक X १०० | | २.३२ |
| ६ | व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल X १०० | | १.५९ |
| ७ | मुदत ठेवींचे एकूण ठेवीशी प्रमाण | मुदत ठेवी (बचत व चालू ठेवी वगळून ) ÷ एकूण ठेवी X १०० | | ९२.१६ |
| ८ | सरासरी ठेव वाढीचे प्रमाण | गतवर्षीचे ठेव ÷ सरासरी ठेव X १०० | | १०.४५ |
| ९ | स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | स्वनिधी ÷ खेळते भांडवल X १०० | | १३.४२ |
| १० | सभासद वाढीचे प्रमाण | चालू वर्षातील सभासद संख्या ÷ गतवर्षातील सभासद संख्या X १०० | | ४.४१ |
| ११ | थकबाकीचे कर्जाशी प्रमाण | थकबाकी ÷ एकूण कर्ज X १०० | | ०.१७ |
| १२ | सी डी रेशो | एकूण कर्ज - उपलब्ध निधी ÷ ठेवी X १०० | | ६५.०१ |
| १३ | ढोबळ अनुत्पादक जिंदगी प्रमाण | एन पी ए झालेल्या सर्व कर्जांची येणे बाकी ÷ एकूण ढोबळ कर्ज X १०० | | ०.५७ |
| १४ | निव्वळ अनुत्पादक जिंदगी प्रमाण | ढोबळ अनुत्पादक जिंदगी - अनुत्पादक जिंदगीची केलेली तरतूद ÷ अनुत्पादक कर्ज X १०० | | ० |

M R P R S & ASSOCIATES FRN 112705W SATARA

नमुना क्र. एन् - २

**वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल**

(कलम ८१ आणि नियम ६९(३) नुसार)

प्रति

मा. सभासद

स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा

रत्नागिरी

संदर्भ : दि. १३ /०९/२०२५ रोजीचे ठराव क्र. ८ प्रमाणे नेमणुकीचे पत्र

**वैधानिक लेखापरिक्षकांचा आर्थिक पत्रकांबाबत अहवाल**

१. आम्ही दि. ०१/०४/२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीकरीता **स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा** या संस्थेच्या सोबत जोडलेल्या आर्थिक पत्रकांचे लेखापरिक्षण केले असून सदर आर्थिक पत्रकांमध्ये दि. **३१/०३/२०२६** रोजीचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणा-या वर्षाचे नफा तोटा पत्रक, महत्वाच्या हिशोब धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश होतो.

**आर्थिक पत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये सदर आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय मंडळाची असून त्यामध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अंतर्गत नियंत्रण आराखडा व रचना तयार करणे, अंमलात आणणे व देखभाल करुन आर्थिक पत्रके तयार करणे की जेणेकरुन त्यामध्ये महत्वाची खोटी किंवा चुकीची माहिती / विधाने नसावित की जी त्रुटीने / चुकीने किंवा अफरातफरीने असोत.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३. आमच्या लेखापरिक्षणानुसार सदर आर्थिक पत्रकांबाबत अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया यांनी नेमून दिलेल्या आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे लागू असणा-या प्रमाणकांप्रमाणे आम्ही लेखापरिक्षण क़ेले आहे. सदर प्रमाणकांप्रमाणे आम्ही नितिमत्तेचे पालन करणे आणि आर्थिक पत्रके महत्वाच्या त्रुटी / चुकांपासून मुक्त आहेत याबाबत पुरेसे आश्वस्त होण्याकरीता लेखापरिक्षणाचे नियोजन आणि कार्य करावे लागते.

४. आर्थिक पत्रकांमध्ये नमूद केलल्या रक्कमा आणि माहिती याबाबत लेखापरिक्षण पुरावा गोळा करण्यासंबंधीच्या कार्याचा लेखापरिक्षणात समावेश होतो. फसवणूक अथवा चुकीमुळे होणा-या आर्थिक पत्रकांमधील दोषांबाबतच्या जोखमीचा अंदाजाप्रमाणे लेखापरिक्षण कार्यातील पद्धती निवडल्या जातात. सदर जोखमीचा अंदाज करताना, सद्य परिस्थितीत योग्य अशा लेखापरिक्षण कार्यपद्धती ठरविण्यासाठी संस्थेच्या आर्थिकपत्रके तयार आणि सादर करण्यासंबंधीच्या अंतर्गत नियंत्रणांचा विचार लेखापरिक्षकाकडून केला जातो. वापरलेल्या हिशोबातील धोरणांची योग्यता, व्यवस्थापनाने केलेले अंदाज आणि आर्थिक पत्रकांचे सर्वसाधारण सादरीकरण याबाबतच्या मूल्यांकनाचा देखील लेखापरिक्षणात समावेश होतो.

५. आमच्या लेखापरिक्षाणाच्या अभिप्रायाकरीता आम्ही मिळवलेला लेखापरिक्षणातील पुरावा पुरेसा आणि योग्य आहे असा आमचा विश्वास आहे.

**अभिप्राय**

६. आमच्या मते, आम्हाला मिळालेली माहिती आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणांनुसार सदर हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, इतर लागू असलेले अधिनियम,

Reg.No. (R.T.G.)/(R.T.G.) R.S.R.(C.R.) 705/(90-91) Year 1991

M R P R S & ASSOCIATES FRN 112705W SATARA

निबंधकांनी जारी केलेली परिपत्रके यांना अनुसरुन आणि भारतात स्विकारलेली हिशोबाची मूलतत्वे यानुसार खालीलप्रमाणे खरी व सत्य स्थिती दर्शवितात -

१. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०२६ रोजीची संस्थेची आर्थिक परिस्थिती

२. नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपलेल्या वर्षाचा नफा

**अन्य कायदे आणि नियामक बाबींवरील अहवाल**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधियमातील तरतुदींनुसार ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की

(अ) आमच्या माहिती आणि समजुतीप्रमाणे लेखापरिक्षणाकरीता आवश्यक असणारी माहिती आणि खुलासे आम्हाला मिळाले आहेत आणि ते आम्हास समाधानकारक आढळेलेले आहेत.

(ब) आमच्या निदर्शनास आलेले संस्थेचे व्यवहार संस्थेच्या अधिकारात आहेत.

(क) संस्थेची कार्यालये आणि शाखांकडून मिळालेली माहिती लेखापरिक्षणाकरीता पुरेशी आढळलेली आहे.

९. आमच्या मतानुसार संस्थेचा ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संस्थेला लागू असणा-या लेखांकन मानांकनानुसार आहेत.

१०. आम्ही आणखी अहवाल देतो की-

१) या अहवालासंदर्भातील ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संस्थेची हिशोबपुस्तकांशी आणि माहितीपत्रकांबरोबर जुळणारे आहेत.

२) हिशोबाच्या पुस्तकांचे तपासणीनुसार संस्थेने अधिनियमानुसार आवश्यक असणारी हिशोब पुस्तके ठेवलेली आहेत.

३) आवश्यकतेनुसार शाखेच्या लेखापरिक्षकांनी दिलेले शाखांचे लेखापरिक्षण अहवाल आम्ही विचारात घेतेलेले आहेत.

४) चालू लेखापरिक्षण वर्षाकरीता संस्थेला **"अ"**लेखापरिक्षण वर्ग देण्यात आला आहे.

स्थान : रत्नागिरी

दिनांक : १०/०८/२०२६

M R P R S & ASSOCIATES FRN 112705W SATARA

सही

**FOR M R P R S & ASSOCIATES**

CHARTERED ACCOUNTANTS

FRN : 112705W

SATYAJIRAO CHANDRAKANT BHOSALE

PARTNER (MEMBERSHIP NO. : 132863)

UDIN : 26132863KWXOOJ8146

Reg.No. (R.T.G.)/(R.T.G.) R.S.R.(C.R.) 705/(90-91) Year 1991

**व्यवस्थापक** **अध्यक्ष**

स्वरुपानंद सह. पतसंस्था मर्या. रत्ना. जिल्हा

# पतसंस्था चळवळीची ताकद फार मोठी!

**गुजरातमधील बडोदा जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अ‍ॅड. दीपक पटवर्धन खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. त्या कार्यक्रमात त्यांनी केलेल्या भाषणाचा हा संपादित अंश...**

...............

पतसंस्था चळवळीला समाजजीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सर्वसामान्य माणसाला ही व्यवस्था आपली वाटते. आपल्या मनातील एखादी इच्छा पूर्ण करण्यासाठी आर्थिक बळाची आवश्यकता असते, तेव्हा त्याला पतसंस्थेचा आधार मिळू शकतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या चळवळीमागे तिच्याशी जोडलेल्या असंख्य व्यक्तींची ताकद उभी असते.

काही सहकारी संस्थांमध्ये गैरप्रकार होतात आणि त्यामुळे समस्या निर्माण होतात, ही वस्तुस्थिती आहे. अशा वेळी त्याचे पडसाद राजकीय क्षेत्रातही उमटतात; मात्र अशा घटना अपवादात्मक आहेत. सहकार चळवळीचे खरे सामर्थ्य वेगळे आहे. या व्यवस्थेत एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा हात धरते आणि अशा अनेक व्यक्तींची एकत्रित ताकद संस्थेला बळ देते. मोठ्या प्रमाणावर भांडवल उभे करण्याची क्षमता या चळवळीत आहे. संस्थांशी जोडलेले सभासद आणि त्यांचा सहभाग हेच या क्षमतेमागील बळ आहे.

बडोदा फेडरेशनने २५ वर्षांचा टप्पा पूर्ण करून पुढील वाटचालीसाठी पाऊल टाकले आहे. पतसंस्थांसाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे, कायदेविषयक मंच उपलब्ध करून देणे, शैक्षणिक सुविधा आणि प्रशिक्षण देणे अशा विविध माध्यमांतून फेडरेशन पतसंस्थांसाठी काम करीत आहे. संस्थांच्या दैनंदिन कामकाजासाठीही ते मार्गदर्शन करत आहे.

**विश्वासाबरोबर आर्थिक शिस्तही महत्त्वाची**

पतसंस्थांच्या वाटचालीत विश्वासार्हतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचबरोबर कठोर परिश्रम आणि आर्थिक शिस्तही तितकीच महत्त्वाची आहे. प्रत्येकाच्या मनात आर्थिक शिस्तीची जाणीव असायला हवी. संपूर्ण पारदर्शकता, शिस्त आणि लोकांना सेवा देण्याची इच्छा या तीन गोष्टी केंद्रस्थानी ठेवून सहकारी पतसंस्था चालवली, तर तिच्या यशाची वाटचाल कोणीही रोखू शकत नाही.

या संदर्भात रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा अनुभव सांगू इच्छितो. मी सुमारे ३० वर्षांपूर्वी भारतीय जनता पक्षाकडून बँकेवर निवडून गेलो. बँकेचे कामकाज काही फारसे चांगले चाललेले नसल्याचे त्यानंतर लक्षात आले. बँकेचा एनपीए ६३ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता; मात्र सर्व संचालकांनी एकत्र येऊन बँकेला प्रगतिपथावर नेण्याचा निर्धार केला. त्याचे परिणाम पुढे दिसून आले. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची बँक बनली. सातारा सहकारी बँकेनंतर रत्नागिरी जिल्हा सहकारी बँकेचा क्रमांक आहे. इतकेच नव्हे, तर दोन वर्षांपूर्वी बँकेने विशेष बाब म्हणून आपल्या भागधारकांना ३० टक्के लाभांश दिला. एखादी गोष्ट साध्य करण्याचा निर्धार करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे हा बदल घडू शकला.




## एका कप चहाचा किस्सा

बँकेच्या कठीण काळातील आणखी एक प्रसंग मी सांगू इच्छितो. एका समारंभानिमित्त राज्याचे अर्थमंत्री रत्नागिरीत आले होते. ते बँकेत आले आणि अध्यक्षांशी गप्पा मारत होते. संचालकही बाजूला बसले होते. अर्धा तास झाला. अखेर अर्थमंत्र्यांनी गमतीने विचारले की, 'केवळ गप्पाच सुरू राहणार आहेत की चहा वगैरेही मिळणार आहे?'

त्यावर अध्यक्षांनी स्पष्टपणे सांगितले, 'आम्ही बँकेत चहा देत नाही.'

बँकेत चहाही दिला जात नाही, याचे अर्थमंत्र्यांना आश्चर्य वाटले. त्यावर बँक मोठ्या तोट्यात असल्यामुळे हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. एक कप चहा वाचवून किती पैसे वाचणार, असा त्यांचा स्वाभाविक प्रश्न होता; पण या निर्णयामागे केवळ एका कप चहाचा खर्च वाचवण्याचा विचार नव्हता. बँकेला सुधारण्याची नैतिक जबाबदारी संचालकांची आहे, अशी त्यामागची

भावना होती. राज्याचे अर्थमंत्री बँकेत आले असताना त्यांचे स्वागत करून त्यांना एक कप चहा देण्याचीही बँकेची ऐपत नाही, ही गोष्ट संचालकांच्या मनावर मोठे ओझे होती; मात्र हेच ओझे त्यांना अधिक चांगले काम करण्यासाठी प्रवृत्त करीत होते. त्यामुळे बँक नफ्यात येईपर्यंत अनावश्यक खर्च करायचा नाही, असा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर इतिहास बदलला. बँक कठीण परिस्थितीतून बाहेर आली आणि चांगल्या स्थितीत पोहोचली.

## लोकांचा पैसा सुरक्षित ठेवणे हे कर्तव्य

या अनुभवातून पतसंस्था चालवणाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा संदेश आहे. लोक कष्टाने कमावलेला पैसा मोठ्या विश्वासाने सहकारी संस्था आणि पतसंस्थांकडे ठेवतात. त्यामुळे तो पैसा पूर्णपणे सुरक्षित ठेवणे ही संस्थांची जबाबदारी आहे. त्या पैशांचा जास्तीत जास्त योग्य विनियोग करणे, दिलेल्या कर्जाची वसुली करणे आणि त्यातून संस्थेचा आर्थिक स्तर उंचावणे हे संस्थेचे कर्तव्य आहे. विविध पतसंस्थांमध्ये चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी फेडरेशनने भक्कमपणे उभे राहावे. संस्थांना आवश्यक मार्गदर्शन आणि पाठबळ मिळत राहावे, ही अपेक्षाही याच संदर्भात महत्त्वाची ठरते.

## दीड कोटीच्या ठेवीमागचा विश्वास

मी ज्या स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा अध्यक्ष आहे, त्या संस्थेचा एक अनुभवही सांगू इच्छितो. सुमारे दहा वर्षांपूर्वी एक बांधकाम व्यावसायिक वारंवार आपल्या कार्यालयात येण्याचे निमंत्रण देत होता; मात्र कोणतेही विशेष कारण नसल्याने त्याच्याकडे जाणे टाळले जात होते. एके दिवशी सकाळी त्याचा फोन आला. 'आज काहीही करून आमच्या कार्यालयात याच," असा त्याचा आग्रह होता. दुपारी पुन्हा फोन आला आणि सायंकाळी चार वाजताही त्याने फोन केला. वारंवार फोन येत असल्यामुळे अखेर त्याच्या कार्यालयात जाण्याचा निर्णय घेतला.

कार्यालयात पोहोचल्यानंतर त्या बांधकाम व्यावसायिकाचा वाढदिवस असल्याचे समजले. वाढदिवसाची कल्पनाच नसल्यामुळे आपण रिकाम्या हाताने आल्याची खंत वाटली. त्याने मात्र स्वागत केले. त्याला मी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर त्याने चेकबुक समोर ठेवले आणि सांगितले, 'तुम्हाला पाहिजे ती रक्कम लिहा. मला तुमच्याकडे ठेव ठेवायची आहे. तुम्ही माझ्या कार्यालयात याल, त्या वेळी स्वरूपानंद संस्थेकडे ठेव ठेवायची, असे मी ठरवले होते."

परंतु दुसऱ्या व्यक्तीच्या चेकवर मी रक्कम लिहिणे योग्य नसल्याचे सांगून मी त्याला नकार दिला. त्याने अनेकदा आग्रह केला, तरीही चेकवर रक्कम लिहिली नाही. मी त्याला सांगितले, की 'आज तुमचा वाढदिवस आहे. तुमच्आ मनात असेल तेवढी ठेव स्वरूपानंद संस्थेत ठेवा.' त्याने चेकबुक परत घेतले. स्वतः रक्कम लिहिली, सही केली आणि चेक हातात दिला. त्यावरील आकडा पाहिल्यानंतर मला आश्चर्याचा धक्का बसला. तो चेक होता तब्बल एक कोटी ५० लाख रुपयांचा!

या घटनेतून दोन गोष्टी अधोरेखित होतात. पहिली म्हणजे संस्थेवर असलेला विश्वास. त्या व्यक्तीच्या कृतीतून स्वरूपानंद संस्थेवरील विश्वास दिसून आला. दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे पतसंस्थांनी नेहमी पांढऱ्या पैशांचेच व्यवहार केले पाहिजेत. काळ्या पैशांचे व्यवहार करू नयेत.

## सहकारातून समृद्धीकडे

गुजरात हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गृहराज्य आहे. 'सहकार से समृद्धी' हा त्यांचा नारा आहे. सहकारातून समृद्धीचा हा विचार प्रत्यक्षात आणायचा असेल, तर सहकार चळवळीचे सामर्थ्य समजून घ्यायला हवे. ही चळवळ कोणत्याही जागतिक चळवळीपेक्षा कमी नाही. सहकार क्षेत्रातील सर्वांची एकत्रित ताकद एवढी मोठी आहे, की तिच्या माध्यमातून चांगला भारत घडविण्यासाठी योगदान करता येऊ शकते.

'सहकारातून समृद्धी' हा मंत्र प्रत्यक्षात आणताना प्रत्येकाला सोबत घेऊन चालणे हे प्रत्येक सहकारी संस्थेचे कर्तव्य आहे. विश्वासार्हता कायम ठेवून आणि पूर्ण आर्थिक शिस्तीने काम करण्याचा निर्धार केला, तर चांगले परिणाम होऊ शकतात. त्या परिणामांसाठी संस्थांच्या पाठीशी बडोदा फेडरेशनसारख्या सर्वांना एकत्र आणण्यासाठी काम करणाऱ्या फेडरेशनची भक्कम साथ आवश्यक आहे.

२५ वर्षांची वाटचाल पूर्ण करून पुढे जाणाऱ्या बडोदा फेडरेशनला या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा. महाराष्ट्र राज्य संस्था फेडरेशनच्या वतीनेही फेडरेशनचे अभिनंदन आणि शुभेच्छा. फेडरेशनचे संपूर्ण संचालक मंडळ आणि सर्व सभासदांनाही पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.


**'स्वरूप सहकार'चे सर्व अंक ई-बुक स्वरूपातही उपलब्ध**

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे मुखपत्र

संस्थेची वेबसाइट — स्कॅन करून वाचा.

Google Play Books — स्कॅन करून वाचा.

Google Books — स्कॅन करून वाचा.

मोफत उपलब्ध










गुजरातमधील बडोदा जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. (त्यांचे भाषण वाचा पान नऊवर)



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी अलिबागच्या कमळ नागरी पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली.





सहकार विभागाचे रत्नागिरी जिल्हा उपनिबंधक राम कुलकर्णी आणि सहकार विभागाचे अपर निबंधक तथा सहसचिव संतोष पाटील यांनी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली. संस्थेचे व्यवस्थापक मोहन बापट यांनी त्यांचा सत्कार केला.


वाहन खरेदी कर्ज
प्रति लाख हप्ता
२११३/-*
(मुदत ५ वर्ष)
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363 www.swaroopanandpatsanstha.com


२० मिनिटांत उपलब्ध!
जलद, सुलभ, किफायतशीर
सोनेतारण कर्ज
मर्यादा १ कोटी पर्यंत
अल्प व्याजदर *
ऐवजाचे जास्तीतजास्त व्हॅल्युएशन
तुमच्या ऐवजाची संपूर्ण सुरक्षितता
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363 www.swaroopanandpatsanstha.com